# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः18.11.2025** **वारःमंगळवार**

---

1. जागतिक अस्थिरतेच्या आणि आव्हानांच्या पार्श्वभूमीवर, भारताची विकसित देश होण्याच्या दिशेने वेगाने प्रगती- पंतप्रधानांच प्रतिपादन
2. बिहारमधील भाजपच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक आज पाटणा इथ होणार
3. दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणी आणखी एकाला अटक आणि
4. जागतिक नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताचा ऑलिंपिकपटू गुरप्रित सिंग याला पुरुषांच्या 25 मीटर पिस्तुल गटात रौप्य पदक

**<u>पंतप्रधान</u>**

सध्या विविध क्षेत्रातील जागतिक अस्थिरतेच्या आणि आव्हानांच्या पार्श्वभूमीवर भारत विकसित देश होण्याच्या आणि आत्मनिर्भरतेच्या दिशेने वेगाने प्रगती करत आहे, अस प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केल. नवी दिल्लीत काल आयोजित 6 व्या रामनाथ गोयंका व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी पंतप्रधानांनी विविध विषयांचा आपल्या भाषणात विस्तृत आढावा घेतला पंतप्रधान आपल्या भाषणात म्हणाले की भारत आज जगात केवळ सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून पुढे येत नसून विकसंच नवीन मॉडेल म्हणून ही आदर्श ठरत आहे. 2022 साली युरोपात आलेल जागतिक उत्पादन पुरवठा साखळी संकट आणि ऊर्जा संकट असो अथवा 2023 मध्ये पश्चिम आशियातील आर्थिक स्थिति प्रतिकूल झाली असताना ही भारताचा आर्थिक विकासाचा दर मजबूत राहिला आणि सध्या ही तो 7 टक्क्यांच्या आसपास आहे अस ही मोदी यांनी सांगितल. नुकत्याच झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकांचे निकाल ऐतिहासिक असून 1951 नंतर बिहार मध्ये सर्वात जास्त मतदान झाल असल्याच सांगून मोदी म्हणाले की यावेळी मतदानंत पुरुषांपेक्षा महिलंच मतदान 9 टक्क्यांनी जास्त होत आणि हे यशस्वी लोकशाहीच द्योतक आहे.

**<u>बिहार बैठक</u>**

बिहारमधील भाजपच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक आज पाटणा इथ होणार आहे. नुकत्याच झालेल्या बिहार विधानसभेच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाचे 89 आमदार निवडून आले आहेत. या बैठकीत बिहारचे भाजप पर्यवेक्षकही सहभागी होतील अस बिहार भाजपचे प्रदेशाध्यक्ष दिलीप जयस्वाल यांनी सांगितल. संयुक्त जनता दल पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक उद्या होण्याची शक्यता असून त्यानंतरच एनडीए आघाडीतील पक्षांच्या आमदारांची एकत्र बैठक होण्याची शक्यता आहे. काल पाटणा इथ राष्ट्रीय जनता दलाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक झाली त्यामध्ये तेजस्वी यादव यांची विधि मंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड करण्यात आली. दरम्यान, येत्या गुरुवारी पाटणा इथल्या गांधी मैदानावर, मुख्यमंत्री आणि नवीन सरकारचा शपथविधि समारंभ होणार असून त्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह राष्ट्रीय लोकशाही आघाडीमधील महत्वाचे नेते उपस्थित राहणार आहेत.

**राष्ट्रपती**

16 व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ अरविंद पनगढिया यांच्या नेतृत्वाखाली आयोगाच्या सर्व सदस्यांनी काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली आणि 2026 ते 2031 या कालावधीसाठी तयार केलेला आपला अहवाल त्यांना सुपूर्द केला. राष्ट्रपती द्रौपदी मुरमू यांनी काल समाजमध्यमावर याविषयी माहिती दिली  राज्यघटनेच्या 280 खंड 1 या कलमानुसार 16 व्या वित्त आयोगाची स्थापना राष्ट्रपतीनी केली असून, या आयोगाने देशातील केंद्र सरकार, विविध राज्य सरकारांच्या आर्थिक स्थितीच विस्तृत विस्लेषण केल आहे केंद्रीय अर्थमंत्र्यांनी  संसदेत हा अहवाल सादर केल्यावरच तो सार्वजनिक करण्यात येईल अस अर्थमंत्रालयाने सांगितल आहे.

**आयात निर्यात**

देशाची व्यापारीतूट ऑक्टोबरमध्ये 42 अब्ज डॉलरपर्यंत वाढली आहे. सप्टेंबरमध्ये ती 32 अब्ज 15 कोटी डॉलर होती. सोने आणि चांदीची आयात वाढल्यानं व्यापारीतूट वाढल्याचं वाणिज्य मंत्रालयानं म्हटलं आहे. ऑक्टोबरमध्ये सोनेआयात 200 टक्कयांनी वाढली, तर देशातून होणारी व्यापारी वस्तूंची निर्यात वार्षिक तुलनेत 11 पूर्णांक 8 दशांश टक्क्यांनी कमी होऊन 34 अब्ज 38 कोटी डॉलरवर आल्याचं समोर आलं आहे. याच महिन्यात व्यापारी वस्तूंची आयात 16 पूर्णांक 63 दशांश टक्क्यांनी वाढून 76 अब्ज डॉलरवर गेल्याचं वाणिज्य मंत्रालयानं म्हटलं आहे.

एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत व्यापारीवस्तू आणि सेवांची एकत्रित निर्यात वार्षिक 4 पूर्णांक 8 दशांश टक्क्यांनी वाढून 491 अब्ज डॉलरवर पोहोचली असल्याचंही वाणिज्य मंत्रालयानं काल जाहीर केलेल्या आकडेवारीवरून स्पष्ट झालं आहे. या काळात निर्यात 62 शतांश टक्कयांनी वाढली, तर आयात 6 पूर्णांक 37 शतांश टक्क्यांनी वाढल्याचं वाणिज्य मंत्रालयानं म्हटलं आहे.

**सर्वोच्च निकाल**

महाराष्ट्रातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये एकंदर आरक्षणावर असलेली 50 टक्क्यांची कमाल मर्यादा पाळावीच लागेल, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयानं काल दिला. बांठिया आयोगाच्या निष्कर्षांच्या आधारे या निवडणुकीत ओबीसी आरक्षण लागू करायच्या सरकारच्या निर्णयासंबंधीच्या याचिकांवर, काल सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. त्यावेळी न्यायालयानं हे निर्देश दिले.

**शेख हासिना**

बांगलादेशाच्या माजी पंतप्रधानशेख हसिना यांना आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायाधीकरणाने काल फाशीची शिक्षा सुनावली. गेल्यावर्षी जुलै महिन्यात झालेल्या हिंसाचाराबद्दल त्यांना दोषी ठरवण्यात आलं आहे. ऑगस्ट 2024 मधे विद्यार्थी आंदोलकांना मारण्याच्या उद्देशाने बळाचा वापर करण्याचे आदेश हसिना यांनी दिले, असं न्यायाधीकरणाने म्हटलं आहे. गुन्हेगारी कट रचणं, चिथावणी देणं यासह अनेक गुन्ह्यांसाठी हसिना यांना दोषी ठरवण्यात आलं आहे. शेख हसीना यांच्यासह माजी केंद्रीय गृहमंत्री असदुज्जमान खान कमाल यांनाही फाशीची शिक्षा देण्यात आली आहे. माजी पोलीस महानिरीक्षक चौधरी अब्दुल्ला अल मामुन हे माफीचे साक्षीदार झाल्याने त्यांना पाच वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. निकालाच्या पार्श्वभूमीवर बांगलादेशात कडक पोलीस बंदोबस्त ठेवला आहे. तसंच सैन्याच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. दरम्यान, शेख हसिना यांनी बांगलादेशात परतायला नकार दिला असून सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. हा निकाल लोकशाही प्रक्रियेद्वारे निवडून न आलेल्या सरकारने दिलेला असून राजकीय हेतूने प्रेरित आहे, अशी टीका हसिना यांनी केली आहे.

**दिल्ली- बॉम्बस्फोट**

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात एनआयएनं काल श्रीनगरमधून जसीर बिलाल वनी याला अटक केली. या बॉम्बस्फोटासाठी तांत्रिक मदत जसीर वनी यानं केल्याचा आरोप एनआयएनं केला आहे. त्यानं ड्रोन्स विकसित करून बॉम्बस्फोटापूर्वी त्या ठिकाणी मारा केला, असं तपास यंत्रणेनं म्हटलं आहे. या प्रकरणात वनीनं उमर नबीची योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी सक्रिय सहभाग घेतल्याचं दिसून येत आहे. या कटाचा तपास करण्यासाठी विविध बाजूंनी तपास केला जात असून, वेगवेगळ्या राज्यात शोधमोहीम राबवून या दहशतवादी हल्ल्यातील आरोपींचा शोध घेतला जात असल्याचं एनआयनं स्पष्ट केलं आहे.

**आसाम-निवडणूक**

आसामध्ये होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय निवडणूक आयोगानं एक जानेवारीपर्यंत मतदारयाद्यांचं विशेष पुनरिक्षण करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. दहा फेब्रुवारी रोजी अंतिम मतदारयाद्या जाहीर केल्या जातील, असं आयोगानं म्हटलं आहे.

**अपघात**

सौदी अरेबियात मदिना जवळ बस आणि डिझेल टँकर यांच्यात धडक होऊन झालेल्या दुर्घटनेत 45 भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला असून केवळ 1 जण बचावला आहे. मृतांमध्ये 17 पुरुष, 18 महिला आणि 10 बालकं आहेत. प्रत्येक मृत भारतीय नागरिकाच्या कुटुंबियाला 5 लाख रुपये मदत म्हणून देणार असल्याचं तेलंगणा सरकारनं जाहीर केलं आहे. तेलंगणा सरकारचं एक प्रतिनिधी मंडळ सौदी अरेबियाला पाठवण्याचा निर्णयही राज्य सरकारनं घेतला आहे.

**नेमबाजी**

इजिप्तमध्ये सुरू असलेल्या जागतिक नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताचा ऑलिंपिकपटू गुरप्रित सिंग यानं पुरुषांच्या 25 मीटर पिस्तुल गटात रौप्य पदक पटकावलं. जागतिक स्पर्धेतलं गुरप्रितचं हे दुसरं रौप्यपदक आहे. त्यानं 2008 मध्ये 25 मीटर स्टँडर्ड पिस्तुल गटात रौप्यपदक मिळवलं होतं. इजिप्तमधील जागतिक स्पर्धेत तीन सुवर्ण, सहा रौप्य आणि चार कास्य अशी एकूण 13 पदकं मिळवत भारतानं पदकतालिकेत तिसरं स्थान मिळवलं आहे.

# या बरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.